# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/12/2023 (गुरूवार) दुपार


---

## चोरी

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत मौजा मसली शिवार काटोल येथे दिनांक १८/१२/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– संजय रामु पाटील, वय ५६ वर्ष, रा. मसली काटोल याने जितेंद्र गुलाबराव पाटील यांना बोलविले असता शेतातील बोरवेल मध्ये पडलेले पाणी ओलविण्याचे समरसेल मशीनला लावलेला १३०० फुट किंमती २०,०००/– रू वायर त्यांना दिसला नाही म्हणुन त्याने फोन करून फिर्यादीला सांगीतले फिर्यादीने आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आला नाही. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मेश्राम मो. क्र. ८३८००७२२३६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत १५ किमी अंतरावर खैरगाव येथे दिनांक १९/१२/२०२३ चे १४.०० वा. ते १५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– गणपती किसनाजी कनेरी, वय ४० वर्ष, रा. खैरगाव व फिर्यादीची पत्नी हे दिनांक १९/१२/२०२३ रोजी सकाळी ८/०० वा. सुमारास मजुरीच्या कामाला मदणा गावी निघुन गेले व १५/०० वा. दरम्यान मजुरीच्या कामावरुन खैरगाव घरी परत आले असता फिर्यादीचे बांधकाम सुरु असलेल्या घराजवळ व बाजुला कापुस पडलेला दिसला तेव्हा फिर्यादीने त्याचे बांधकाम सुरु असलेल्या घरात ठेवलेला शेतातील कापुस बघीतला असता फिर्यादीने ठेवलेल्या कापसामधुन अंदाजे २० ते २५ किलो कापुस किंमती अंदाजे २,०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास स.फौ. ईंगळे पोस्टे नरखेड हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा धापेवाडा खूर्द वाडोना येथे दिनांक १८/१२/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक १९/१२/२०२३ चे ०९.०० वा. यातील फिर्यादी नामे– बंडू शंकरराव पिपळे, वय ५२ वर्ष रा. ब्राम्हणी वार्ड क्र. ०२ ता. कळमेश्वर जि. नागपूर हे एम. एस. ई. बी. सब डिव्हीजन कळमेश्वर येथील धापेवाडा विभागात नौकरीवर असून दिनांक १९/१२/२०२३ रोजी सकाळी ०९/०० वा. चे दरम्यान कार्यालयात हजर असता लाईनमेन निकोसे यांनी फिर्यादीला माहीती दिली की, मौजा वाडोना येथील रोडला लागून असलेले ट्रान्सफार्मर खाली पडून तूटलेल्या अवस्थेत दिसुन आले. घटनास्थळावरील ट्रान्सफार्मर तोडून त्यातील तांब्याचे कॉईल व ऑईल किंमती ४५,०००/– रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दयाराम करपाते मो. नं. ९९६०६८२४७८ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर